भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.७० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०१/२०१७

**१) विवाहीतेला हुंडयाची मागणी करून लज्जास्पद शब्दात बोलुन वाईट वागणुक दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०६/२०१४ ते ०६/१२/२०१४ वा. दरम्यान. यातील आरोपी क्र.१ हा पती व आरोपी क्र. २ हे सासरे असुन यातील आरोपीतांनी संगनमत करून हुंडयाची मागणी करून लज्जास्पद शब्द बोलुन वाईट वागणुक देवुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोंदीया शहर येथे अप क्र. ००/१७ कलम ४९८(अ),३५४,५०९,५०६ भादवी सहकलम ३,४ हुंडा प्रतीबंधक कायदयाचे कागदपत्र पोलीस स्टेशन साकोली ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोउपनी. वानखेडे साकोली पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) निष्काळजीपने मोटार सायकल चालवुन मुलीला धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २६/०१/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान. यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे त्याब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने हयीगयीने व निष्काळजीपने चालवुन कु. आसना सुधीर दिनकर वय साडेतीन वर्ष रा. पलाडी हिला धडक मारून जखमी करून पडुन गेल्याने जखमीचे वडीलाचे बयान व डॉ. मेमोवरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १८४,१४३/१८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक २६/०१/२०१७ चे १७.४५ वा. दर. यातील तिन्ही आरोपी हे मध्यार्काचे सेवन करून त्यांचे त्याब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ०१८३ वर बसुन वाहन चालवितांनी व गाडीवर उभे होवुन सार्वजनीक ठिकानी आरडा ओरड करून येणा—या जाणा—या लोंकाना शिवीगाळ तसेच हातवारे इसारे करून असभ्य वर्तन करतांनी मिळुन आल्याने त्यांचे डॉक्टर गां.रू. पवनी यांचे कडुन दारू पिलेल्या बाबद एमएलसी केली असता डॉ. नि मध्यार्काचे अमलाखाली असल्याचे रिपोर्ट दिल्य सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ८५ (१) म.दा.का. सहकलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २६/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ केसेस, तीन सिटर वाहनांवरती ५५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.